MHBI120011882025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३३१/२०२५**

शशिकला व इतर

विरुध्द कोणीही नाही

**निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना मृत्युपत्र, व्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणूक करण्यासंबंधी तरतुद करण्याबाबत विनियम (बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७) मधील कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;**

अर्जदार हे अर्जामध्ये नमूद पत्त्यावरील रहिवासी असून अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ चे वडील नामे चंद्रकांत पि. दशरथ चिरके हे दिनांक ०२.०६.२०२५ रोजी मयत झाले आहेत. कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ ही मुलगी या नात्याने सरळ व कायदेशीर वारस आहेत. कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांना अर्जदार ह्याच एकमेव कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ चे वडील कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके हे दिनांक ०२.०६.२०२५ रोजी मयत झाले आहेत. कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांचे आई–वडील हे यापूर्वीच मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारांना चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांचे पश्चात शासकीय,

निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांचे वारस हक्काचे प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने तसा वारस दाखला मिळणेकरीता सदरचा अर्ज केला आहे.

४. अर्जदार क्र.२ प्रिती भ्र. हनुमंत साखरे यांनी त्यांच्या कथनाचे पुष्टयर्थ निशाणी क्र.१४ येथे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून निशाणी क्र.७ व ८ येथे अर्जदारांच्या आधार कार्डाच्या प्रमाणीत प्रती, निशाणी क्र.६ येथे कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत व निशाणी क्र.१३ येथे दिनांक १७.१२.२०२५ रोजी दै.संकेतमध्ये प्रसिध्द झालेली पेपर नोटीस इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

५. दिनांक १७.१२.२०२५ रोजी दै.संकेतमध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीस (निशाणी १३) व जाहीरनामा (निशाणी ९) प्रसिध्द करुन अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतू जाहीर नोटीस (निशाणी १३) आणि जाहीरनामा (निशाणी ९) प्रसिध्द झालेनंतर अर्जदार यांच्या नावे वारसा दाखला देण्यासंदर्भात मुदतीत कोणीही हरकत नोंदवली नाही. त्यानंतर अर्जदार क्र.२ प्रिती भ्र. हनुमंत साखरे यांनी त्यांच्या कथनाचे पुष्टयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१४ येथे दाखल केले आहे व अर्जातील कथने जशीच्या तशी शपथेवर सांगितलेली आहेत. तसेच अर्जदारांतर्फे निशाणी १५ येथे तोंडी पुरावा संपलेची पुरसिस दाखल केलेली आहे.

६. अर्जदार क्र.२ प्रिती भ्र. हनुमंत साखरे यांचा शपथेवरील जबाब (निशाणी १४) व या प्रकरणातील कागदपत्रास कोणीही आक्षेप नोंदविला नसल्यामुळे, ती जशीच्या तशी शाबीत झालेली आहेत. अर्जदार यांची अर्जातील

कथने व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ ही मुलगी असल्याचे स्पष्ट होते. उपलब्ध कागदपत्रांवरुन व पुराव्यावरुन कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांच्या अर्जदार ह्या हिंदू वारसा अधिनियमातील तरतूदीनुसार वर्ग–१ च्या वारस असलेची बाब स्पष्ट झालेली आहे.

७. सबब, अर्जदारांनी मागणी केलेप्रमाणे कै.चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ ही मुलगी या नात्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरत आहेत. त्यामुळे अर्जदार यांचे नावे वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देणे योग्य व न्यायोचीत होणार आहे. सबब, अर्जदारांचा तोंडी व लेखी पुरावा याचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | मयत चंद्रकांत पि. दशरथ चिरके यांच्या अर्जदार क्र.१.शशिकला भ्र. चंद्रकांत चिरके व २.प्रिती भ्र. हनुमंत साखरे ह्या कायदेशीर वारस असल्याची माझी खात्री झाल्याने अर्जदार यांचे नावे अर्जदार यांनी योग्य ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर औपचारिक वारसा दाखला (Heirship Certificate) देण्यात यावा. |

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2026.04.20 16:26:54 +0530

ठिकाण – धारुर

दिनांक –२०.०४.२०२६

(एन.एम.वाली)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
धारुर

**:: <u>Certificate of Stenographer</u> ::**

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order/judgment. ”

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur